# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.02.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्याशी द्विपक्षीय चर्चा
2. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राची काल सांगता; नवीन प्राप्तीकर विधेयकाची लोकसभेत मांडणी
3. माणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू
4. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन आणि
5. 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा आज समारोप; 54 सुवर्ण पदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

**मोदी-अमेरिका दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वॉशिंग्टन डीसी इथल्या व्हाईट हाऊसमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या दुसऱ्या कार्यकाळातला पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच अमेरिका दौरा आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील धोरणात्मक भागीदारी यापुढंही सुरूच राहणार असून ट्रम्प यांनी दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी मोलाचं योगदान दिलं आहे, असं मत मोदी यांनी व्यक्त केलं. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील ट्रम्प यांच्या विजयाबद्दल मोदींनी त्यांचं अभिनंदन केलं. हे युद्धाचं युग नसून प्रश्न मुत्सद्देगिरीनं सोडवले पाहिजेत असं सांगत ट्रम्प यांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मोदींनी आनंद व्यक्त केला. भारत अमेरिकेकडून तेल आणि वायू खरेदी करेल, असंही मोदी यांनी सांगितलं. तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या वक्तव्यात सांगितलं की, मोदी हे त्यांचे दीर्घकाळापासूनचे मित्र असून ते महान नेते आहेत.

**मोदी-अमेरिका**

आपल्या अमेरिका भेटीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वॉशिंग्टन डीसी मध्ये अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मायकल वॉल्ट्झ यांचीही भेट घेतली. संरक्षण, तंत्रज्ञान आणि सुरक्षा या मुद्यांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर्स आणि अवकाश तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात परस्पर सहकार्याची मोठी क्षमता आहे,असं पंतप्रधान मोदी यांनी या भेटीनंतर समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, मोदी यांनी अमेरिका दौऱ्यात भारतीय-अमेरिकन उद्योजक आणि रिपब्लिकन पक्षाचे नेते विवेक रामास्वामी यांचीही भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये भारत-अमेरिका संबंध, नावीन्य, जैवतंत्रज्ञान आणि भविष्य घडवण्यात उद्योजकतेची भूमिका यावर यावेळी अभ्यासपूर्ण चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांचीही भेट घेऊन चर्चा केली.

**संसद-मुंबई**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा काल संपला; त्यामुळे संसदेची दोन्ही सभागृह येत्या 10 मार्चपर्यंत संस्थगित करण्यात आली आहेत. गेल्या महिन्यात 31 जानेवारी रोजी अधिवेशनाचा पहिला टप्पा सुरू झाला होता. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात 112 टक्के कामकाज झाल्याचं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं. तत्पूर्वी वक्फ दुरुस्ती विधेयक 2024

बाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल काल संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांच्या गदारोळात सादर करण्यात आला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवीन प्राप्तीकर विधेयक लोकसभेत मांडलं. विद्यमान प्राप्तीकर कायदा सोपा आणि सुटसुटीत करण्यासाठी हे नवीन विधेयक सरकारनं सादर केलं आहे. हे विधेयक संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्याची शिफारस सीतारामन यांनी केली. आगामी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी समितीनं अहवाल सादर करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सीतरामन यांनी काल राज्यसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तरही दिलं. सामान्य नागरिकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी सरकार विविध उपाययोजना सुरू ठेवेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करणारा आहे, असं त्या म्हणाल्या. प्राप्तीकरातल्या सवलतींचा फायदा केवळ श्रीमंतांना होईल, हा विरोधकांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला.

**<u>मणिपूर</u>**

मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. गृह मंत्रालयानं यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मणिपूरच्या राज्यपालांकडून अहवाल प्राप्त झाला होता आणि या अहवालावर विचार केल्यानंतर, घटनेच्या कलम 356 द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आल्याचं अधिसूचनेत म्हटलं आहे.

**<u>पिफ</u>**

पुणे फिल्म फाउंडेशन, महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात पिफचं उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते काल झालं. महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, विश्वस्त सतीश आळेकर, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांच्यासह सांस्कृतिक विभागाचे वरिष्ठ अधिकारी महोत्सवाचे आंतरराष्ट्रीय परीक्षक, तज्ञ आणि रसिक यावेळी उपस्थित होते. राज्य सरकार मुंबईत 10 एकर जागेवर मनोरंजन क्षेत्रातली जागतिक स्तरावरची शैक्षणिक संस्था उभारणार असल्याचं आशिष शेलार यांनी यावेळी सांगितलं. यंदाचं वर्ष हे ज्येष्ठ अभिनेते राज कपूर यांचं जन्मशताब्दी वर्ष आहे; त्यानिमित्त 'शोमन राज कपूर' ही यावर्षीच्या महोत्सवाची संकल्पना असल्याचं डॉ. जब्बार पटेल यांनी सांगितलं. प्रसिद्ध अभिनेत्री शुभा खोटे यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड', तर प्रसिद्ध पार्श्वगायिका कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.उद्घाटन सोहळ्याच्या सुरुवातीला दिवंगत उस्ताद झाकीर हुसेन यांना अभिवादन म्हणून तालकचेरी हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दिग्दर्शिका मार्गारिटा व्हिसारिओ यांचा ग्लोरिया हा उद्घाटनाचा चित्रपट दाखवण्यात आला. येत्या वीस तारखेपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात विविध देश-परदेशातले सुमारे 150 चित्रपट, दाखवले जाणार आहेत.

**<u>पाकिस्तान</u>**

ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल या संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात पाकिस्तान जगातील सर्वात भ्रष्ट देशांपैकी एक असल्याचं सांगितलं आहे. न्यायव्यवस्था आणि समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये ही समस्या पसरली असल्याचं देखील अहवालात म्हणलं आहे. महागाई वाढत असल्यामुळे लोकांना आरोग्यासह अनेक मूलभूत सेवांसाठी संघर्ष करावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय संस्था आणि मित्र देशांकडून घेतलेल्या कर्जावर देशाची अर्थव्यवस्था टिकून असल्याचं यात सांगितलं आहे.

**<u>महाकुंभ</u>**

महाकुंभ दरम्यान सुरू असलेल्या कुंभवाणी वाहिनीचं प्रसारण हे प्रसार भारतीच्या अचूक आणि विश्वासार्ह माहिती देण्याच्या उद्देशाचे प्रतिक असल्याचं प्रतिपादन प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत सहगल यांनी केलं. प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभ मध्ये स्नान केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात सहगल बोलत होते. कुंभवाणी या वाहिनीचं कौतुक करताना थेट आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी हे महत्वाचं केंद्र म्हणून उदयाला आल्याचं ते यावेळी म्हणाले. सहगल यांनी नैनी अरेल संगम सेक्टर 4 इथं बांधलेल्या आकाशवाणी आणि दूरदर्शन केंद्राची त्यांनी पाहणी केली आणि प्रसारण यंत्रणेचा आढावा घेतला. भविष्यातही अशा प्रकारचे नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू राहिले पाहिजेत जेणेकरून अधिकअधिक लोकांना याचा फायदा होईल असंही ते यावेळी म्हणाले.

**<u>टोरेस फसवणूक</u>**

टोरेस गुंतवणूक फसवणूक प्रकरणात मुंबईमध्ये अटक करण्यात आलेल्या यूक्रेन च्या एका अभिनेत्याने आरोपी संस्थेच्या कारवायांशी आपला संबंध नसल्याचा दावा करत जामिनासाठी अर्ज केला आहे. आताइन ला गेल्या महिन्यात अटक करण्यात आली असून सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. आतापर्यंत 10 हजार 848 गुंतवणूकदारांनी फसवणुकीच्या तक्रारी मुंबई पोलिसांकडे केल्या असून फसवणुकीची रक्कम 57 कोटींच्या पुढे गेली आहे.

**<u>राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा</u>**

38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा समारोप आज उतराखंड मधल्या हल्दवानी इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे. दुपारी दोन वाजता या समारोप सोहळ्याला सुरुवात होईल. 28 जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन झालं होतं. 35 क्रीडा प्रकारात या स्पर्धा घेण्यात आल्या. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष आणि खासदार पीटी उषा उपस्थित यांच्यासह अन्य मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये 67 सुवर्ण पदकांसह सैन्य दलाचा संघ पदकतालिकेत प्रथम क्रमांकावर असून महाराष्ट्र 54 सुवर्ण पदकासह दुसऱ्या तर 46 सुवर्ण पदकांसह हरियाणा पदकतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला प्रीमियर लीग च्या तिसऱ्या पर्वाला आजपासून वडोदरा इथं सुरुवात होणार आहे. गतविजेत्या रॉयल चॅलेंजर बंगळुरू आणि गुजरात जायंट यांच्यातील सलामीच्या लढतीने आज संध्याकाळी साडे 7 वाजता सुरुवात होईल. पाच संघांमध्ये होणारी ही स्पर्धा 15 मार्च पर्यंत चालणार असून अंतिम सामना मुंबईत ब्रेबोर्न मैदानावर होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.